P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक -३०/०९/२०२२**

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील एकूण १३६ पोलीस अंमलदारांची पदोन्नती झाल्याने, तसचे ५ अधिकारी/अंमलदार हे पोलीस दलातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेहस्ते सत्कार समारंभ कार्यक्रम संपन्न झाले बाबत.

दिनांक ३०.०९.२०२२ रोजी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील नेमणूकीस असलेले एकूण १३६ पोलीस अंमलदार यांना पदोन्नती देण्यात आल्याने तसेच ५ अधिकारी व अंमलदार हे नियत वयोमानानुसार पोलीस दलातून सेवानिवृत्त होत असल्याने मा. श्री. अंकुश शिंदे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, यांचे हस्ते सर्व पदोन्नती प्राप्त पोलीस अंमलदार व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम पोलीस मुख्यालय, निगडी येथे आयोजित करण्यात आला.

मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांनी, जे पोलीस अमंलदार त्यांचे सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी पात्र आहेत अशा सर्व पोलीस अंमलदार यांना पदोन्नती देण्याबाबत प्रशासकीय अधिकारी, पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड यांना आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील नेमणूकीस असलेले एकूण १३६ पोलीस अंमलदार यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. यामध्ये पदोन्नती मिळालेल्या पोलीस अंमलदारपैकी ४५ पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उप-निरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच ९५ पोलीस अंमलदार यांची पोलीस नाईक ते पोलीस हवालदार पदी पदोन्नती देण्यात आलेली आहे असे एकूण १३६ पोलीस अमंलदार यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. पदोन्नती झालेल्या अंमलदारांना सपत्निक बोलावुन मा. पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा दिल्या.

तसेच श्री. अनिल राजाराम दबडे (सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा), श्री. नंदू ज्ञानोबा खुळपे (प्रशासकीय अधिकारी, आस्थापना शाखा), श्री. संजय आनंदराव काळे (पोलीस उप-निरीक्षक), श्री. विनायक दगडु वरपे (पोलीस हवालदार), श्री. संजय बबन भागवत (पोलीस नाईक) हे नियत वयोमानानूसार पोलीस दलातून सेवानिवृत्त होत असल्याने यांचाही मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सेवापुर्ती सत्कार सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कार्यक्रमात बोलताना मा. पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे, यांनी पोलीस अंमलदार हे पोलीस दलाचा पाया असून दिवस-रात्र रस्त्यांवर उभे राहून जनतेच्या रक्षणासाठी आपले कर्तव्य बजावत आहेत, अशा वेळी त्यांच्या कामाचे कौतुक करून मनोबल वाढवल्यास त्यांना अधिकाधिक उत्कृष्ट कर्तव्य बजावता येईल या दृष्टीकोनातुन सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी पात्र आहेत अशा सर्व पोलीस अंमलदार यांना पदोन्नती देण्यात आली असल्याचे सांगून सर्व पदोन्नती प्राप्त पोलीस अंमलदार यांना समाजासाठी उत्कृष्ट काम करून जागतिक स्तरावर लौकिक मिळविणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलाची शौर्याची व त्यागाची परंपरा जोपासून पोलीस दलाचे नाव उंचवावे असे गौरवोद्गार करत मार्गदर्शन करुन पुढील कर्तव्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस दलात येवून समाजासाठी आपण दिलेले योगदान नक्कीच कौतूकास्पद आहे, सेवानिवृत्तीनंतरही आपले हातुन अशीच जनसेवा घडावी असे बोलून सत्कारमुर्ती पोलीस अधिकारी/अंमलदार यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे वतीने सन्मानचिन्ह व भेटवस्तु देवून पुढील वाटचालीस व भावी आयुष्यास शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रम प्रसंगी मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे यांचे सह श्री. संजय शिंदे अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, श्री. मंचक इप्पर, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ -१, यांचेसह पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व प्रभारी अधिकारी व अंमलदार यांनी सर्व सत्कारमुर्ती यांना पुढील आयुष्यासाठी व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**(रावसाहेब जाधव)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा,
जनसंपर्क अधिकारी पिंपरी चिंचवड